ePaper "जे देवाची देणगी वाचवू शकले नाही, ते पेपरफुटी कशी थांबवणार?"

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 29 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

पीसीएमसीची सर्वसाधारण सभा गाजली!

## अल्पवयीन व गुन्हेगारी रेकॉर्ड नसलेल्या विद्यार्थ्यांची तातडीने सुटका करण्याचे आदेश

# आंदोलक विद्यार्थ्यांना 'सुप्रीम' दिलासा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशभरातील विद्यार्थी आंदोलनांदरम्यान झालेल्या कथित पोलिस अत्याचारांप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निर्देश दिले. आंदोलनादरम्यान अटक करण्यात आलेल्या १८ वर्षांखालील आणि पूर्वी कोणताही गुन्हेगारी इतिहास नसलेल्या सर्व विद्यार्थ्यांची तातडीने सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने संबंधित राज्य सरकारांना दिले. तसेच संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करण्याची गरजही न्यायालयाने अधोरेखित केली.**



मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणतीही दबावात्मक कारवाई करता येणार नाही. आंदोलन सुरू असल्याचे कारण देऊन पोलिसांच्या कथित अतिरेकाचे समर्थन होऊ शकत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने आंदोलनाशी संबंधित सीसीटीव्ही, ड्रोन, बॉडी कॅमेरा आणि वायरलेस संवादाची नोंद सुरक्षित ठेवण्याचे, तसेच आंदोलनकर्त्यांची वैयक्तिक किंवा डिजिटल माहिती पुढील सुनावणीपर्यंत सार्वजनिक न करण्याचे निर्देश दिले. आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांविरुद्ध कोणतीही दंडात्मक किंवा दबावात्मक कारवाई करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

दिल्लीसह विविध राज्यांतील आंदोलनांदरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या घटनांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे संकेतही न्यायालयाने दिले. शांततापूर्ण आंदोलनात समाजविघातक घटक घुसू शकतात, हा पोलिसांचा युक्तिवाद नोंदवत अशा घटकांवर कायद्यानुसार कारवाई होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले.

नीट आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली, बिहार, महाराष्ट्र, आसाम, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि केरळ या सात राज्य सरकारांना नोटिसा बजावत उत्तर मागविले आहे. तसेच घटनांशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याचे निर्देशही दिले आहेत.




सुनावणीदरम्यान न्यायालयाने आंदोलनकर्त्यांवरील पॅलेट गनचा वापर, इलेक्ट्रिक बॅटन, पत्रकार आणि वकिलांवरील हल्ले तसेच महिलांवरील कथित अत्याचार यांसारख्या आरोपांचीही गंभीर दखल घेतली. या सर्व प्रकरणांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी संविधानाने नागरिकांना शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार दिला असून, या अधिकाराचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अनावश्यक दडपशाही होऊ नये, असे नमूद करत सर्व पक्षांनी न्यायालयाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

### सात राज्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या नोटिसा

नीट आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली, बिहार, महाराष्ट्र, आसाम, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि केरळ या सात राज्य सरकारांना नोटिसा बजावल्या आहेत. घटनांशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

### १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांच्या सुटकेचे आदेश

आंदोलनादरम्यान अटक करण्यात आलेल्या १८ वर्षांखालील आणि पूर्वी कोणताही गुन्हेगारी इतिहास नसलेल्या विद्यार्थ्यांची तातडीने सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना दिले. संबंधित विद्यार्थ्यांवर पुढील सुनावणीपर्यंत दबावात्मक कारवाई न करण्याचेही आदेश देण्यात आले.



### पुरावे सुरक्षित ठेवण्यावर न्यायालयाचा भर

आंदोलनाशी संबंधित सीसीटीव्ही, ड्रोन, बॉडी कॅमेरा आणि वायरलेस संवादाची नोंद सुरक्षित ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच आंदोलनकर्त्यांची वैयक्तिक आणि डिजिटल माहिती पुढील सुनावणीपर्यंत सार्वजनिक करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

# पुण्यात पुन्हा गँगवॉर भडकणार?

## कृष्णा आंदेकरच्या खुनाचा कट उघड; प्रतिस्पर्धी टोळीकडून पोलीस वाहनाचा पाठलाग

**महाईन्यूज । पुणे**

**नाना पेठेतील बंडू आंदेकर आणि सोमनाथ गायकवाड टोळीत वर्चस्वाच्या वादातून टोळीयुद्ध भडकले असताना न्यायालयात नेत असताना कृष्णा आंदेकर, त्याचे भाच्यांवर गोळीबार करण्याचा कट रचण्यात आलेल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आले आहे. पोलीस वाहनाचा पाठलाग करुन आंदेकर, त्याच्या भाच्यांवर गोळीबार करण्याचा कट सोमनाथ गायकवाड याचा साथीदार सूरज ठोंबरे याने रचल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी सूरज ठोंबरे याच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला.**



या प्रकरणी सूरज अशोक ठोंबरे (वय २४, रा. नाना पेठ), मानव शरद ढमाले (वय २४), वेदांत रोहित सावंत (वय २१), धीरज लखारा ( तिघे रा. धनकवडी), अथर्व दत्तात्रय खोपडे (वय २१, रा. गुजरवाडी, कात्रज) यांच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गुन्हे शाखेच्या युनिट दोनमधील पोलीस उपनिरीक्षक तेजश्री पवार यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वर्चस्वाच्या वादातून दोन वर्षांपूर्वी माजी नगरसेवक वनराज आंदेकर याचा नाना पेठेतील डोके तालमीजवळ सोमनाथ गायकवाड टोळीतील सराइतांनी खून केला होता. वनराज आंदेकरच्या खुनाचा सूड उगविण्यासाठी आंदेकर टोळीच्या म्होरक्या बंडू आंदेकर याच्या सांगण्यावरुन आयुष कोमकर, गणेश काळे यांचे खून करण्यात आले होते. दोन महिन्यांपूर्वी पुणे-सातारा रस्त्यावर अक्षय काळे याच्यावर गोळीबार करण्यात आला होता.

आंदेकरसह साथीदारांना या प्रकरणात अटक करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. आंदेकर, त्याचा मुलगा कृष्णा, नातू स्वराज वाडेकर, तुषार वाडेकर हे नंदूरबार कारागृहात आहे. कृष्णा आंदेकर, स्वराज वाडेकर, त्याचा भाऊ तुषार यांना न्यायालयीन कामकाजासाठी शिवाजीनगर न्यायालयात आणण्यात आले होते. नंदूरबार कारागृह ते शिवाजीनगर न्यायालय दरम्यान पोलीस वाहनातून त्यांना आणण्यात आले होते. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना पुन्हा नंदूरबार कारागृहात पाठविण्यात येणार होते. सोमनाथ गायकवाड याचा जवळचा साथीदार सूरज ठोंबरे याने आंदेकर, वाडेकर यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचला होता.

मानव ढमाले याच्या सांगण्यावरुन साथीदार वेदांत सावंत, धीरज लखारा, अथर्व खोपडे यांनी शिवाजीनगर ते चाकणपर्यंतच्या रस्त्याची पाहणी करुन पोलीस वाहनावर हल्ला करुन आंदेकर, वाडेकर यांच्या खुनाचा कट रचल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. आरोपींना हल्ला करण्यासाठी पिस्तुल पुरविल्याचे तपासात उघड झाले आहे. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त गौहर हसन, सहायक आयुक्त शैलेश संखे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा!

**महाईन्यूज । पुणे**

**‘पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या उच्च क्षमता सामूहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर) प्रकल्पाला आवश्यक असलेली ३० टक्के सरकारी जमीन पुणे महापालिकेला विनामोबदला हस्तांतरित करावी,’ असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच, ‘एचसीएमटीआर’, ‘पुणे रिंग रोड’ आणि बोगद्यांचे जाळे या तीन प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उभारणीसाठी स्वतंत्र ‘एसव्हीपी’ कंपनी तयार करण्याच्या सूचना फडणवीस यांनी केल्या.**



शहरी वाहतूक प्रकल्पांच्या नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेखीसाठी गठित उच्चस्तरीय समितीची बैठक मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झाली. त्यामध्ये त्यांनी हे आदेश दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्र्यांसमोर प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ‘शहरातील कोंडी सोडविण्यासाठी ‘एचसीएमटीआर’, बोगदा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजाविणार आहेत. या प्रकल्पांसाठी लागणारी शासकीय जमीन पुणे महापालिका व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावे. याबरोबरच पुणे शहराच्या भोवती प्रस्तावित असलेल्या रिंग रोड प्रकल्पासाठी लागणारी खासगी जमीन संपादनासाठी रोख मोबदला देण्यात यावा. ‘एचसीएमटीआर’साठी ३० टक्के सरकारी जमीन विनामोबदला देण्यात यावी.

या प्रकल्पामुळे २५ ते ३० टक्के वाहतूक कमी होणार आहे. यामुळे सर्व मेट्रो मार्ग जोडले जाणार असून, रस्त्याची वाहतूक क्षमता वाढणार आहे. त्यामुळे ‘एचसीएमटीआर’ या प्रकल्पाचे काम लवकर सुरू करून २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. यासाठीचे आर्थिक मॉडेल तयार करून प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिले.

### रिंग रोडची वैशिष्ट्ये

- प्रकल्पाचा एकूण खर्च – २५ हजार १५९ कोटी
- प्रकल्पाचे टप्पे – टप्पा १ – सोळू इंटरचेंज ते वडगाव शिंदे (मनपा हद्द) (४.७० किमी लांबी), लोहगाव (मनपा हद्दीपासून) ते वाघोली (७.५६ किमी)
- टप्पा २ – वाघोली ते कदमवाक वस्ती (९.३६ किमी लांबी)
- टप्पा ३ – कदमवाक वस्ती ते जांभूळवाडी (२१.४८ किमी)
- टप्पा ४ – जांभूळवाडी ते भूगाव (१४.२१ किमी)
- टप्पा ५ – भूगाव ते परंदवाडी (२५.८० किमी)

# पीसीएमसीची सर्वसाधारण सभा गाजली!

## दोन डॉक्टर बडतर्फ, शहर अभियंतापदी मनोज सेठिया; आरोग्य, क्रीडा व आयटीआयबाबत महत्त्वाचे निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत गुरुवारी अनेक महत्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील दोन शल्यचिकित्सकांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले, तर शहर अभियंतापदी मनोज सेठिया यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली.**




वायसीएम रुग्णालयाच्या पदव्युत्तर संस्थेत सहायक प्राध्यापक व सर्वसाधारण शल्यचिकित्सक म्हणून कार्यरत असलेले डॉ. ज्ञानेश्वर बोराडे हे तब्बल १,३५३ दिवस विनापरवाना गैरहजर राहिल्याने अध्ययन व रुग्णसेवेवर परिणाम झाल्याचे प्रशासनाने नमूद केले. तसेच प्राध्यापक व शल्यचिकित्सक डॉ. बालाजी धायगुडे यांच्याविरोधातील गैरवर्तणुकीच्या प्रकरणातही कारवाई करत दोघांनाही महापालिका सेवेतून बडतर्फ करण्याच्या प्रस्तावाला सभेने मंजुरी दिली.

दरम्यान, जनगणनेच्या कामावर असलेल्या एका शिक्षिकेचा विनयभंग केल्याचा आरोप असलेल्या महापालिका कर्मचारी दिलीप आडे यांच्यावर अद्याप निलंबनाची कारवाई का करण्यात आली नाही, असा सवाल नगरसेवकांनी उपस्थित केला. त्यानंतर महापौरांनी आडे यांना तातडीने निलंबित करण्याचे आदेश प्रशासनाला दिले.

याच बैठकीत महापालिकेच्या शहर अभियंतापदी मनोज सेठिया यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली.

सभेत आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला. या समितीला ५० लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे नामकरण करून क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन विकास व सांस्कृतिक विभाग असे नवीन नाव देण्यात आले. या समितीमार्फत क्रीडा, पर्यटन, सांस्कृतिक धोरणे, सार्वजनिक ग्रंथालये, स्पर्धा परीक्षा केंद्रे व अभ्यासिकांच्या धोरणांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

याशिवाय मोरवाडी व कासारवाडी येथील महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना भविष्यात शासकीय योजनांचा लाभ मिळावा, यासाठी त्यांच्या नावात बदल करून 'पिंपरी-चिंचवड महापालिकेची शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था' असे नामकरण करण्यासही सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली.

### विनयभंगप्रकरणी कर्मचाऱ्याच्या निलंबनाचे आदेश

जनगणनेच्या कामावर असलेल्या एका शिक्षिकेचा विनयभंग केल्याचा आरोप असलेल्या महापालिका कर्मचारी दिलीप आडे यांना अद्याप निलंबित का करण्यात आले नाही, असा सवाल सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी उपस्थित केला. यावर नगरसेवकांच्या संतप्त भावना लक्षात घेऊन महापौरांनी संबंधित कर्मचाऱ्याला तातडीने निलंबित करण्याचे आदेश प्रशासनाला दिले.

# दोन चिमुकल्या बहिणींवरील अत्याचारप्रकरणी ६१ वर्षीय नराधमाला अटक



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ताथवडे परिसरात दोन सख्ख्या अल्पवयीन बहिणींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ६१ वर्षीय व्यक्तीला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), पोक्सो (POCSO) कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेच्या १० वर्षीय आणि ४ वर्षीय मुलींवर आरोपीने मे २०२६ ते २७ जुलै २०२६ या कालावधीत वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडित कुटुंब अनुसूचित जातीतील असल्याची माहिती आरोपीला असूनही त्याने हा गुन्हा केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडित मुलींपैकी एका मुलीच्या पोटात वारंवार दुखू लागल्याने कुटुंबीयांना संशय आला. मुलींशी संवाद साधल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली.

घटनेची माहिती मिळताच रविवारी रात्री पीडित कुटुंबीयांसह नागरिकांनी वाकड पोलीस ठाण्यात गर्दी करून आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत अटक केली.

या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७६/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४(२), ६५(२), ७४, ७६, ३५१(३), पोक्सो कायद्याचे कलम ४, ६, ८, १२ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमातील कलम ३(२)(V)(VA) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास वाकड पोलीस करत आहेत.

### पोटदुखीमुळे उघडकीस आला धक्कादायक प्रकार

पीडित मुलींपैकी एका मुलीच्या पोटात वारंवार दुखू लागल्याने कुटुंबीयांना संशय आला. मुलींशी विश्वासाने संवाद साधल्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. त्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने वाकड पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ आरोपीला अटक करून पोक्सोसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदविला.

### मे महिन्यापासून सुरू होता अत्याचार

फिर्यादीनुसार, आरोपीने मे २०२६ ते २७ जुलै २०२६ या कालावधीत दोन अल्पवयीन सख्ख्या बहिणींवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. संशय आल्यानंतर कुटुंबीयांनी मुलींशी संवाद साधला आणि हा गंभीर प्रकार उघडकीस आला.

### पोक्सोसह गंभीर कलमांखाली गुन्हा

आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), पोक्सो कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७६/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.





## भूमिका

**केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे देशाच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे. हा राजीनामा केवळ एका मंत्र्याच्या पदत्यागापुरता मर्यादित नसून, जनआंदोलन, विरोधकांची भूमिका आणि सत्ताधाऱ्यांच्या निर्णयप्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करणारा ठरला आहे.**

# राहुल गांधी आणि विरोधकांचा हा पुनर्जन्म ठरेल का?



कोणत्याही लोकशाहीत सरकारला जनभावनांचा आदर करावा लागतो आणि हा निर्णय त्याच दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने अनेक संवेदनशील विषयांवर कठोर भूमिका घेतली. त्यामुळे सरकार दबावाला झुकत नाही, अशी प्रतिमा निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत सातत्याने झालेली आंदोलने, विद्यार्थ्यांचा असंतोष, विरोधी पक्षांची आक्रमक भूमिका आणि वाढता सामाजिक दबाव या पार्श्वभूमीवर झालेला राजीनामा राजकीय दृष्ट्या वेगळे महत्त्व प्राप्त करतो. सरकारने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे. तर विरोधक हा आपल्या संघर्षाचा विजय असल्याचा दावा करत आहेत.

या प्रकरणामुळे राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरही नव्याने चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही वर्षांत सातत्याने सरकारवर टीका करणारे राहुल गांधी अनेकदा अपेक्षित राजकीय परिणाम साधण्यात अपयशी ठरल्याची टीका होत होती. मात्र या आंदोलनात विरोधी पक्षांना एकत्र आणण्यात आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यात त्यांना काही प्रमाणात यश मिळाल्याचे दिसून आले. त्यामुळे विरोधी पक्षांच्या राजकारणाला नवसंजीवनी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तथापि, एका मंत्र्याच्या राजीनाम्यावरून राष्ट्रीय राजकारणाची दिशा बदलली, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. भाजपची संघटनात्मक ताकद, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि देशभरातील पक्षाची राजकीय पकड अजूनही भक्कम आहे. दुसरीकडे, विरोधकांसमोर एकजूट टिकविणे, जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणे आणि पर्यायी राजकीय विश्वास निर्माण करणे ही मोठी आव्हाने कायम आहेत. एखाद्या आंदोलनातील यश हे निवडणुकीतील यशात रूपांतरित होईलच, याची खात्री नसते.

लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक या दोघांचीही भूमिका तितकीच महत्त्वाची असते. सरकारने जनतेच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घेणे आवश्यक असते, तर विरोधकांनी केवळ आंदोलन न करता विधायक पर्यायही मांडणे अपेक्षित असते. या घटनेने एवढे मात्र स्पष्ट केले आहे की, संघटित लोकमत आणि सातत्यपूर्ण लोकशाही मार्गाने उभारलेला दबाव सरकारलाही निर्णय बदलण्यास भाग पाडू शकतो.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे खरे राजकीय परिणाम आगामी काळात दिसून येतील. हा विरोधकांच्या पुनरुज्जीवनाचा प्रारंभ ठरेल की केवळ एका विशिष्ट परिस्थितीत घेतलेला अपवादात्मक निर्णय म्हणून इतिहासात नोंदला जाईल, हे भविष्यातील राजकीय घडामोडी ठरवतील. मात्र या घटनेने भारतीय लोकशाहीत जनआंदोलनांचे महत्त्व आणि जनमताची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

## प्रासंगिक »

### आत्मज्ञान

**एका संतांनी वनात कुटी बांधून साधे जीवन स्वीकारले होते. ते परमेश्वराचे चिंतन करत आणि येणाऱ्या प्रत्येकाचे प्रेमाने स्वागत करत.**

एक तरुण त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन शिष्य बनला. संतांनी त्याला तपश्चर्या आणि मनावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व सांगितले. हे ऐकून शिष्याने स्वतःला एका खोलीत बंद करून मन जिंकण्याचा प्रयत्न सुरू केला. तो बाहेरच्या जगापासून पूर्णपणे दूर राहू लागला.

काही दिवसांनी संतांनी त्याला बाहेर बोलावले. ते हातात एक वीट घेऊन दगडावर घासू लागले. शिष्याने आश्चर्याने विचारले, "गुरुजी, हे काय करत आहात?" संत म्हणाले, "या विटेचा आरसा बनवत आहे." शिष्य हसून म्हणाला, "विटेचा आरसा कसा होईल?" त्यावर संत म्हणाले, "जसा विटेचा आरसा होऊ शकत नाही, तसाच केवळ स्वतःला जगापासून दूर ठेवून मन शुद्ध होत नाही. मनावरील अज्ञानाची धूळ ज्ञान, संयम आणि योग्य आचरणाने दूर केली तरच आत्मज्ञान प्राप्त होते."

- तात्पर्य : मनावर संयम ठेवून योग्य विचार आणि कृती केल्यासच आत्मज्ञान व खरी प्रगती साधता येते.

महाराष्ट्रात खरीप हंगामाच्या पेरण्या पूर्णत्वाकडे जात असताना अनेक शेतकरी अजूनही मागील हंगामातील पीकविमा भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

# उत्पादन नव्हे, शेतकऱ्याचे उत्पन्न सुरक्षित करा!



मिळालेली भरपाईही नुकसानाच्या तुलनेत अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांचा पीकविमा योजनेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. याचाच परिणाम म्हणून यंदा पीकविम्यासाठी अर्जांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. प्रधानमंत्री पीकविमा योजना ही मोठी आणि अनुदानित योजना असली, तरी तिचा पाया आजही उत्पादनाधारित आहे.

नुकसानाचे मूल्यांकन वैयक्तिक शेताऐवजी गाव किंवा महसूल मंडळाच्या सरासरी उत्पादनावर केले जाते. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याचे संपूर्ण पीक नष्ट झाले, तरी परिसरातील सरासरी उत्पादन चांगले असल्यास त्याला अपेक्षित भरपाई मिळत नाही. प्रत्यक्ष नुकसान आणि विमा मूल्यांकनातील ही तफावत शेतकऱ्यांच्या नाराजीचे मुख्य कारण आहे.

आज शेतीसमोरील संकट केवळ उत्पादन घटण्यापुरते मर्यादित नाही. अनेकदा विक्रमी उत्पादन होऊनही बाजारभाव कोसळल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. अशा वेळी उत्पादनाधारित विमा निष्प्रभ ठरतो. त्यामुळे आता उत्पादनापेक्षा उत्पन्नाचे संरक्षण करणारी विमा व्यवस्था अधिक आवश्यक आहे. अमेरिका, कॅनडा, स्पेन आणि जपानसारख्या देशांनी उत्पन्नाधारित पीकविमा स्वीकारला आहे.

या मॉडेलमध्ये उत्पादनाबरोबरच बाजारभावाचाही विचार करून शेतकऱ्याच्या अपेक्षित उत्पन्नाची हमी दिली जाते. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती किंवा भावघसरण या दोन्ही परिस्थितींमध्ये शेतकऱ्याला आर्थिक संरक्षण मिळते. भारतातही तंत्रज्ञानाच्या मदतीने पीक नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी विविध उपक्रम सुरू झाले आहेत.

मात्र त्याचबरोबर दावे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा, विलंब झाल्यास व्याजाची तरतूद, संपूर्ण पारदर्शकता आणि टप्प्याटप्प्याने उत्पन्नाधारित पीकविमा लागू करण्याची गरज आहे. हवामान बदल, बाजारातील अस्थिरता आणि वाढती उत्पादन खर्चाची जोखीम लक्षात घेता, शेतकऱ्याला केवळ पीक नव्हे तर त्याचे उत्पन्न सुरक्षित ठेवणारी विमा व्यवस्था काळाची गरज आहे.

उत्पादन सुरक्षिततेकडून उत्पन्न सुरक्षिततेकडे होणारी वाटचाल ही भारतीय कृषी धोरणातील महत्त्वपूर्ण सुधारणा ठरेल आणि शेतकऱ्यांचा हरवलेला विश्वास पुन्हा मिळवून देईल.

## ।। अभंगवाणी ।।



जन विजन जालें आम्हां ।
विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥

पाहें तिकडे बापमाय ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आंदोलकांवर कारवाईची टांगती तलवार?

## पोलीस ठाण्यातून फोन अन् नोटीसा; जबाब नोंदवण्याची प्रक्रिया चालू

**महाईन्यूज । मुंबई**

**कॉक्रोच जनता पार्टीने नीट पेपरफुटीप्रकरणी केलेल्या आंदोलनादरम्यान अनेक आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले असून अनेकांना ताब्यात घेण्यात आलंय. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची सीजेपीची मागणी सरकारने मान्य केली असून गुन्हे मागे घेतले जात असल्याचं सरकारने स्पष्टीकरण दिलं आहे. दरम्यान, असं असतानाही मुंबई पोलिसांनी गुन्हे दाखल झालेल्या आंदोलकांना नोटीस बजावणं आणि जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरूच ठेवलं असल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. तपास थांबविण्याबाबत कोणत्याही प्रकारच्या सूचना अद्याप मिळालेल्या नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.**



तुकाराम मुंढे यांच्या भेटीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी या प्रकरणातील अनेक संदिग्ध मुद्द्यांवर बोट ठेवले. ते म्हणाले, "MPSC ही एक स्वायत्त संस्था आहे, हे आम्ही समजतो. मात्र, आम्ही दिलेले तक्रार अर्ज आणि पुरावे तुकाराम मुंढे यांच्या कार्यालयामार्फत आयोगाकडे पाठवले जातील. २१ जुलै रोजी लोकेश पाटील (उर्फ गौरव पाटील) आणि ऋषिकेश गांगर्डे या तरुणांनी तक्रार अर्ज दिला होता. मुंढे यांच्या कार्यालयाने तातडीने ते पुरावे आयोगाकडे वर्ग करून योग्य कारवाईची विनंती केली होती."

रोहित पवार पुढे म्हणाले, "तुकाराम मुंढे यांचीही हीच स्पष्ट भूमिका आहे की, सनदी किंवा शासकीय अधिकारी पारदर्शक परीक्षेच्या माध्यमातूनच सेवेत आले पाहिजेत. जर कोणी पैसे देऊन किंवा ओळखीने पदावर बसत असेल, तर असा अधिकारी सर्वसामान्य जनतेला कधीच न्याय देऊ शकत नाही."

राज्य सरकार वेळोवेळी शासन निर्णय (GR) जारी करून अशा स्वरूपातील एफआयआर मागे घेण्याची मुदत वाढवत असते. सध्याचा शासन निर्णय ३१ जुलैपर्यंत लागू आहे. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, "बहुतांश प्रकरणांमध्ये तपास सुरू असल्याने ३१ जुलैपूर्वी चार्जशीट दाखल होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे सरकारला पुन्हा मुदतवाढ द्यावी लागेल. चार्जशीट जितक्या लवकर दाखल होतील, तितक्या लवकर शासन निर्णयानुसार गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकेल."

सोमवारी नोटीस मिळालेल्यांमध्ये गोवंडीतील २३ वर्षीय अयान मिर्झाचाही समावेश होता. त्याने २२ जुलै रोजी चेंबूरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे झालेल्या आंदोलनात सहभाग घेतला होता. अयान म्हणाला, "आम्हाला ताब्यात घेतल्यानंतर आरसीएफ पोलीस ठाण्यात नाव, संपर्क क्रमांक आणि इतर माहिती लिहून घेतली होती. त्यानंतर पोलीस माझ्या घरी नोटीस देऊ शकले नाहीत म्हणून त्यांनी मला फोन करून जवळच्या पोलीस ठाण्यात येण्यास सांगितलं. सोमवारी मी देवनार पोलीस ठाण्यात जाऊन नोटीस स्वीकारली." त्याने पुढे सांगितलं की, पोलिसांनी त्याच्या एका मित्राचा संपर्क क्रमांकही घेतला असून त्यालाही नोटीस पाठविण्याची तयारी सुरू आहे.

AISF मुंबईचे अध्यक्ष आमिर काझी म्हणाले, "एफआयआर मागे घेतले जातील, अशी घोषणा झाल्यानंतरही आंदोलकांना मुंबई पोलिसांकडून नोटिसा आणि फोन येत असल्याचं समजल्याने धक्का बसला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि तरुणांमध्ये भीती व संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे."

त्यांच्या म्हणण्यानुसार, पोलीस महासंचालकांनी AISFला मुंबई पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यास सांगितलं असून, गुन्हे मागे घेण्याचा प्रस्ताव असल्याने आंदोलकांना नवीन नोटिसा पाठवू नयेत आणि त्यांना पोलीस ठाण्यात बोलावणं थांबवावं, अशी मागणी त्यात करण्यास सांगितले आहे.

### अंतरिम आदेश देऊन प्रक्रिया थांबवावी

आंदोलकांची बाजू मांडणारे वकील विक्रांत खरे म्हणाले, "पोलीस अद्याप तपास करत असून आरोपींना नोटिसा बजावत आहेत आणि त्यांचा जबाब नोंदवत आहेत. तपास थांबविण्याचे कोणतेही आदेश मिळाले नसल्याचे आम्हाला सांगण्यात आले. औपचारिकरित्या गुन्हे मागे घेण्याचा आदेश होईपर्यंत वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि राज्य सरकारने किमान अंतरिम आदेश देऊन ही प्रक्रिया थांबवावी."

### कायदेशीर औपचारिकता पूर्ण करणं आवश्यक

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, तपास सुरू असल्याने काही आरोपींना पुढील काळातही समन्स मिळू शकतात. "गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया चार्जशीट दाखल झाल्यानंतरच सुरू होते. तोपर्यंत आरोपी व साक्षीदारांचे जबाब नोंदविणं, पंचनामे करणं आणि इतर कायदेशीर औपचारिकता पूर्ण करणं आवश्यक असतं. त्यानंतर प्रकरणे छाननी समितीकडे जातात आणि ती गुन्हे मागे घेण्याबाबत शिफारस करते", असं त्यांनी सांगितलं.

---

# पार्थ पवार आणि प्रफुल्ल पटेलांनी दिल्लीत घेतली शरद पवारांची भेट

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय उलथापालथीचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि पार्थ पवार यांनी बुधवारी नवी दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या महत्त्वाच्या भेटीनंतर फूट पडलेले राष्ट्रवादीचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याच्या आणि विलीनीकरणाच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात प्रचंड जोर धरला आहे.**



विशेष म्हणजे, गेल्याच आठवड्यात कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर अवघ्या काही दिवसांतच अजित पवार गटातील बड्या नेत्यांनी दिल्लीत शरद पवारांची भेट घेतल्याने राजकीय गणिते बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या बैठकीचा अधिकृत अजेंडा किंवा तपशील दोन्ही बाजूंनी जाहीर करण्यात आलेला नसला, तरी या दोन्ही भेटींचा परस्परांशी संबंध जोडला जात असून पक्षात एकत्रीकरणाचे प्रयत्न वेगाने सुरू असल्याचे मानले जात आहे.

मागील काही आठवड्यांपासून शरद पवार आणि अजित पवार यांच्या गटांमध्ये पडद्यामागून चर्चा सुरू असल्याच्या बातम्या सातत्याने समोर येत आहेत. जरी दोन्ही बाजूंचे नेते जाहीरपणे या चर्चा फेटाळून लावत असले, तरी पक्षांतर्गत पातळीवर जोडणीचे प्रयत्न पूर्णपणे थांबलेले नाहीत. काही महिन्यांपूर्वी मंदावलेली विलीनीकरणाची प्रक्रिया या नव्या भेटीमुळे पुन्हा एकदा रुळावर आल्याचे चित्र आहे.

### भाजपची 'एकसंध राष्ट्रवादी'ला पसंती?

राजकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन वेगवेगळ्या गटांशी स्वतंत्रपणे जुळवून घेण्यापेक्षा एकसंध राष्ट्रवादीशी संवाद साधणे भाजपसाठी अधिक सोयीचे ठरेल, असा सूर भाजप नेतृत्वाचा आहे. दोन्ही गटांतील प्रमुख नेते आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांमधील सातत्याने होणाऱ्या बैठकांनंतर विलीनीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाल्याचे बोलले जात आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणत्याही गटाने अधिकृतपणे अंतिम शिक्कामोर्तब केलेले नाही.

# जपानमध्ये विनाशकारी भूकंप!

## ७.१ रिश्टर तीव्रतेचा धक्का; कुमामोतो किल्ला ढासळला, त्सुनामीची भीती

**महाईन्यूज । जपान**

**भूकंप प्रवण देश म्हणून ओळख असलेल्या जपानमध्ये पुन्हा एकदा मोठा भूकंप झाला आहे. दक्षिण जपानमधील क्यूशू बेटावरील कुमामोतो प्रांताला शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला. ज्याची तीव्रता ७.१ रिश्टर स्केल असल्याचे सांगितले जात आहे. जपानच्या हवामान विभागाने यानंतर त्सुनामीचा इशारा दिला आहे. स्थानिक यंत्रणेने समुद्रात उंच लाटा उसळण्याची भीती व्यक्त केली आहे. द्वीप समूहावरील भूकंपाची तीव्रता दाखवणारे अनेक व्हिडीओ आता समोर येत आहेत.**




जपानच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कुमामोतो प्रदेशात १० किमी खोलीवर ७.१ तीव्रतेचा भूकंप झाला. दरम्यान अमेरिकी भूवैज्ञानिक सर्वेक्षण (यूएसजीएस) ने भूकंपाची तीव्रता ६.८ रिश्टर स्केल असल्याचा अंदाज वर्तवला आहे.

जपानमधील सोशल मीडिया हँडलवरून भूकंपाची तीव्रता दिसून येत आहे. कुमामोतो प्रदेशातील प्रसिद्ध अशा कुमामोतो किल्ल्याची दगडी भिंत कोसळताना दिसून येत आहे.

शहरातील एका डिपार्टमेंटल स्टोअरचा व्हिडीओही समोर आला आहे. ज्यामध्ये शेल्फमधील सामान खाली कोसळताना दिसत आहे.

भूकंपामुळे कुमामोतो शहरातील अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्याचे व्हिडीओही समोर आले आहेत. भूस्खलन झाल्यामुळे अनेक ठिकाणी धूळ आणि धुराचे लोट दिसत आहेत. भूकंपाच्या धक्क्यांमुळे इमारतींना हादरे बसले. दुकाने, मॉल्स आणि विमानतळांवर लोक खाली बसून सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करताना दिसले.

### पंतप्रधानांचे आवाहन

भूकंप आणि त्यानंतरच्या धक्क्याच्या पार्श्वभूमीवर जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची यांनी प्रशासनाला खबरदारीचे उपाय योजण्याचे आदेश दिले आहेत. झालेल्या नुकसानीचा तत्काळ आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंतप्रधानांच्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले, "प्रांतातील सरकारांशी समन्वय साधून मानवी जीव वाचविण्याला महत्त्व द्यावे. लोकांचे जीव वाचविण्याला महत्त्व देऊन आपत्ती व्यवस्थापन करण्यास सरकारने कसूर करू नये."

# केंद्रीय कृषी राज्यमंत्र्यांनी ९९ लाखांची सबसिडी अखेर केली परत

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांनी स्वतःच्या मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत काकडीच्या शेतीसाठी घेतलेले ९९ लाख रुपयांचे अनुदान परत केले, अशी माहिती केंद्र सरकारने मंगळवारी लोकसभेत दिली. द इंडियन एक्सप्रेसने महिनाभरापूर्वी केलेल्या तपासणीत चौधरी यांनी त्यांच्याच मंत्रालयांतर्गत असलेल्या फलोत्पादन योजनेद्वारे ९९ लाख रुपयांचे अनुदान घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.**



तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी सांगितले की, भागीरथ चौधरी यांनी संबंधित बँकेकडे अनुदानाची रक्कम परत जमा केली आहे. तसेच संबंधित बँकेला ही रक्कम राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडे परत पाठवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, भगीरथ चौधरी यांच्या व्यतिरिक्त राजस्थानातील जालोरचे भाजप खासदार लुंबाराम चौधरी यांनाही गेल्या पाच वर्षांत राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य मिळाले आहे.

अभिषेक बॅनर्जी यांनी लोकसभेत केंद्रीय मंत्री, खासदार किंवा त्यांच्या कुटुंबीयांना राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या योजनांचा लाभ मिळाला आहे का, तसेच अशा प्रकरणांमध्ये हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी कोणते धोरण आहे का, असा प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना ठाकूर यांनी स्पष्ट केले की, राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सार्वजनिक पदाधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या अर्जांसाठी हितसंबंधांच्या संघर्षाबाबत किंवा स्वतःला प्रक्रियेपासून दूर ठेवण्याबाबत कोणतीही स्वतंत्र तरतूद नाही.

### १६ हजार चौरस मीटरवर काकडीची शेती

भागीरथ चौधरी यांचा काकडी लागवडीचा प्रकल्प १६,५९२ चौरस मीटर क्षेत्रावर असून, २०२५ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाने मंजूर केलेल्या ४६७ प्रकल्पांपैकी तो एक होता. द इंडियन एक्सप्रेसने असेही वृत्त दिले आहे की, केंद्र सरकारमधील वरिष्ठ आयएएस अधिकारी आणि पशुसंवर्धन सचिव नरेश पाल गंगवार यांच्या कुटुंबातील तिघांनी मिळून पाच वर्षांच्या कालावधीत फलोत्पादन अनुदानापोटी १.१६ कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळवली.


### कोणती आहे ही योजना?

व्यावसायिक पातळीवर काकडी, भोपळा मिरची, टोमॅटो तसेच गुलाब, ऑर्किडसह फुलांच्या आठ जातींच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबवली जाते. २०१४-१५ मध्ये सुरू झालेली ही योजना मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ हॉर्टिकल्चर अंतर्गत असून तिची अंमलबजावणी राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ करते. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५० टक्के अनुदान दिले जाते, ज्याची मर्यादा प्रति कुटुंब १ कोटी रुपये इतकी आहे.




# जस्मिनचा संताप..

टीव्ही विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री जस्मिन भसीन लवकरच 'खतरों के खिलाडी १५' या स्टंट-आधारित रिॲलिटी शोमधून छोट्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. रोहित शेट्टी होस्ट करत असलेल्या या शोच्या प्रीमियरपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत जस्मिनने तिच्या लग्नाच्या अफवांवर आणि सतत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवर जोरदार संताप व्यक्त केला आहे. दीर्घकाळापासून अभिनेता अली गोनीला डेट करत असलेल्या जस्मिनने लग्नाच्या प्रश्नावर थेट भाष्य केले. ती म्हणाली, "मला वाटते की माझ्या लग्नाशी कोणाचाही संबंध नसावा. कारण कोणीही आमच्या कॅटरिंगचे बिल भरणार नाहीये आणि लग्नाच्या सजावटीचा खर्चही उचलणार नाहीये. त्यामुळे लोकांनी माझ्या वैयक्तिक आयुष्यात डोकावण्याऐवजी आपल्या कामाशी काम ठेवावे. जेव्हा लग्न करायचे असेल, तेव्हा आम्ही करू आणि ते सर्वांना आपोआप कळेल." लोकांच्या या अवाजवी उत्सुकतेवर उपरोधिक टोला लगावत जस्मिन पुढे म्हणाली, "मला कधीकधी या गोष्टींवर हसू येते. मला समजत नाही की लोक माझ्या वैयक्तिक आयुष्याबाबत इतके उत्सुक का आहेत. कदाचित लोक स्वतःच्या लग्नामुळे खूश नसतील, म्हणूनच त्यांना वाटते की आम्ही दोघे का आनंदी आहोत; आम्हीसुद्धा लग्न करून त्रासले पाहिजे." काही लोकांची मानसिकता इतरांना अडचणीत पाहण्याची असते, पण अशा निरर्थक प्रश्नांना उत्तर देऊन स्वतःचा वेळ वाया घालवायचा नाही, असा निश्चय तिने केला आहे. वैयक्तिक आयुष्याव्यतिरिक्त जस्मिन सध्या तिच्या प्रोफेशनल प्रोजेक्ट्समुळेही चर्चेत आहे. ती 'खतरों के खिलाडी १५' या लोकप्रिय शोमध्ये धोक्यांशी दोन हात करताना दिसणार आहे. हा शो १ ऑगस्टपासून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. यापूर्वीही अनेक मोठ्या टीव्ही शो आणि फिक्शन ड्रामामध्ये तिने आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे.



# संसार मोडला..?

बॉलिवूडचा रॅपर आणि गायक बादशाह पुन्हा एकदा आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. अवघ्या चार महिन्यांपूर्वीच दुसऱ्यांदा विवाहबंधनात अडकलेल्या बादशाहच्या संसारात दुरावा आल्याच्या जोरदार चर्चा सध्या सोशल मीडियावर रंगल्या आहेत. बादशाह आणि त्याची पत्नी, पंजाबी अभिनेत्री ईशा रिखी यांनी एकमेकांना सोशल मीडियावर अनफॉलो केल्याने त्यांच्या घटस्फोटाच्या अफवांना उधाण आले आहे. वर्षानुवर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर बादशाह आणि ईशा यांनी २४ मार्च रोजी अतिशय साध्या आणि गुप्त पद्धतीने लग्नगाठ बांधली होती. मात्र, लग्नाला अवघे चार महिने पूर्ण होत असतानाच त्यांच्या नात्यात कटुता आल्याचे दिसून येत आहे. दोघांनीही इन्स्टाग्रामवरून एकमेकांना अनफॉलो केले असून, एकत्र असलेले काही फोटोही हटवल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व चर्चां दरम्यान ईशा रिखी हिने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर लग्नातील आठवणींचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओसोबत तिने लिहिलेले कॅप्शन सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ईशाने लिहिले आहे: "प्रत्येक वादळ काही ना काहीतरी धडा शिकवून जातं. प्रत्येक प्रार्थना ही एक नवी आशा असते." चाहत्यांनी आणि नेटकऱ्यांनी त्यांच्या नात्यात नक्कीच काहीतरी बिनसले असल्याचे कयास बांधायला सुरुवात केली आहे. ईशाची ही पोस्ट सध्या तुफान व्हायरल होत असून, चाहत्यांकडून त्यावर विविध प्रतिक्रियांचा वर्षाव होत आहे. काही चाहत्यांनी या कठीण काळात दोघांनाही धीर देण्याचा प्रयत्न केला आहे, तर काहींनी बॉलिवूडमधील नात्यांच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.




# 'मैं वापस आऊंगा'ची ओटीटी एंट्री!

इम्तियाज अली दिग्दर्शित 'मैं वापस आऊंगा' या चित्रपट आता ओटीटीवर येण्यास सज्ज झाला आहे. यात  मराठमोळी अभिनेत्री शर्वरी वाघ हिने मुख्य नायिकेची भूमिका साकारली आहे. तर तिच्याबरोबर लोकप्रिय अभिनेता आणि गायक दिलजीत दोसांझ आणि  वेदांग रैना महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकले.

प्रेमकथेवर आधारित या चित्रपटातील गाण्याला अनेकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यानंतर आता हा चित्रपट तुम्हाला घर बसल्या पाहता येणार आहे. पंजाब येथील प्रेमकथेवर आधारित १२ जून रोजी थिएटरमध्ये रिलीज झालेला 'मैं वापस आऊंगा' हा चित्रपट येत्या ७ ऑगस्टपासून ओटीटीवर पाहता येणार आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटाची कथा १९४७ च्या फाळणीच्या वेदना आणि एका अपूर्ण प्रेमकथेभोवती फिरते. फाळणीच्या वेळी एकमेकांवर प्रेम करणारे कसे एकमेकांपासून दुरावतात आणि वर्षांनंतरही त्यांचे प्रेम कसे कमी होत नाही, हे यात दाखवण्यात आले आहे.

चित्रपटात नसिरुद्दीन शाह यांनी एका वृद्धाची भूमिका साकारली आहे, जे आयुष्याच्या शेवटच्या वळणावरही आपल्या जुन्या आठवणी आणि दिलेली वचनं विसरू शकलेले नाहीत. त्यांच्या नातवाच्या भूमिकेत दिलजीत दोसांज दिसून आला आहे, जो आपल्या आजोबांचे ते अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या बाजूला वेदांग रैना याने तरुणपणाची भूमिका साकारली असून शर्वरी वाघ त्याच्या गर्लफ्रेंडच्या भूमिकेत पाहायला मिळाली आहे. दोघांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना प्रचंड आवडली होती. तसेच ए.आर. रहमान यांच्या संगीताने या चित्रपटाला आणखीनच खास बनवले आहे. थिएटरनंतर हा चित्रपट ओटीटीवर (OTT) आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे.

# कोण आहे सारांश जैन?

## स्थानिक क्रिकेट गाजवून ३३ व्या वर्षी थेट भारतीय कसोटी संघात एन्ट्री!

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) आगामी महिन्यात होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यावरील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ घोषित केला आहे. या मालिकेसाठी तरुण फलंदाज शुभमन गिलकडे भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. या निवडीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मध्य प्रदेशचा ३३ वर्षीय अष्टपैलू खेळाडू सारांश जैन याला प्रथमच भारतीय कसोटी संघात स्थान मिळाले आहे. स्थानिक क्रिकेटमधील दीर्घकालीन व सातत्यपूर्ण कामगिरीचे मोठे फळ त्याला अखेर मिळाले आहे.**





मध्य प्रदेशसाठी आतापर्यंत ५० हून अधिक प्रथम श्रेणी सामने खेळलेल्या सारांशने रेड बॉल (दीर्घकालीन) क्रिकेटमध्ये प्रभावी ऑफ-स्पिन गोलंदाजी आणि तळाच्या फलंदाजीत महत्त्वपूर्ण योगदान देऊन आपली क्षमता सिद्ध केली आहे. निवडकर्त्यांनी त्याच्या या कामगिरीची दखल घेत त्याला दिलेली संधी ही त्याच्या कारकिर्दीतील आजवरचा सर्वात मोठा टप्पा मानली जात आहे.

श्रीलंका दौऱ्यासाठी सारांश जैनचा भारतीय संघात समावेश वॉशिंग्टन सुंदरला झालेल्या दुखापतीमुळे झाला आहे. यापूर्वी सारांश 'इंडिया अ' संघासोबत श्रीलंका दौऱ्यावर गेला होता. तेथे दुसऱ्या बिगरअधिकृत कसोटी सामन्यात ६ बळी टिपत नाबाद ७० धावांची अत्यंत महत्त्वपूर्ण खेळी करून त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. विशेष म्हणजे, आयपीएलपासून दूर राहूनही सारांशने स्थानिक क्रिकेटवर आपले पूर्ण लक्ष केंद्रित केले. रणजी करंडक आणि इतर प्रथम श्रेणी स्पर्धांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावरच त्याने थेट भारतीय कसोटी संघात धडक मारली आहे.

मध्य प्रदेशचे प्रतिनिधित्व करताना सारांशने एक भरवशाचा अष्टपैलू खेळाडू म्हणून स्वतःची भक्कम ओळख निर्माण केली आहे. रणजी करंडक स्पर्धेतील चमकदार कामगिरीनंतर त्याला 'इंडिया अ', दुलीप ट्रॉफीमध्ये 'सेंट्रल झोन' आणि इराणी ट्रॉफीमध्ये 'रेस्ट ऑफ इंडिया' यांसारख्या प्रमुख संघांकडून खेळण्याची संधी मिळाली. या सर्व मोठ्या व्यासपीठांवरही त्याने आपल्या दर्जेदार खेळाची छाप सोडली, ज्यामुळे निवडकर्त्यांचा त्याच्यावरील विश्वास अधिक दृढ झाला आणि अखेर राष्ट्रीय संघाचे दरवाजे त्याच्यासाठी उघडले.

शुभमन गिल (कर्णधार), के. एल. राहुल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), साई सुदर्शन*, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुथार, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार, देवदत्त पडिक्कल, सारांश जैन.

### सारांश जैनची प्रभावी कामगिरी

सारांश २०१४ पासून व्यावसायिक क्रिकेट खेळत आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या ५४ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये १८८ बळी घेण्यासोबतच २,२२३ धावाही केल्या आहेत, ज्यामध्ये २ शतके आणि १४ अर्धशतकांचा समावेश आहे. तसेच ४७ 'लिस्ट-अ' सामन्यांमध्ये ३८ बळी व ५५३ धावा आणि २० टी-२० सामन्यांमध्ये १८ बळी अशी त्याची उपयुक्त आकडेवारी राहिली आहे. विशेषतः रणजी करंडक २०२५-२६ च्या हंगामात त्याने अप्रतिम अष्टपैलू कामगिरी केली; ७ सामन्यांत ५१८ धावा (१ शतक, ३ अर्धशतके) उभारण्यासोबतच ३० बळी मिळवून तो आपल्या संघाचा दुसरा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला.

# रात्री ११ ते पहाटे ३ वाजेपर्यंत मारहाण, घराबाहेर हाकललं

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**हरियाणातील अत्यंत गरीब कुटुंबात जन्म, लहानपणी पोलिओमुळे आलेले अपंगत्व, पहिल्या विवाहात सहन केलेला कौटुंबिक छळ आणि आर्थिक संकटांचा डोंगर... या सर्व संकटांवर मात करत भारताच्या पॅरा ॲथलीट शर्मिला धनकरने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. भारतासाठी राष्ट्रकुल स्पर्धेतील पॅरा ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारी ती पहिलीच खेळाडू ठरली आहे.**



### रात्री ११ ते पहाटे ३ पर्यंत मारहाण

अवघ्या १९व्या वर्षी तिचा विवाह झाला. मात्र पहिल्या वैवाहिक आयुष्यात तिला सतत कौटुंबिक छळाचा सामना करावा लागला. अखेर दोन मुलींना घेऊन तिने माहेरी परतण्याचा निर्णय घेतला. त्या आठवणी सांगताना शर्मिला म्हणाली, "एका रात्री माझ्या पहिल्या पतीने रात्री ११ वाजल्यापासून पहाटे ३ वाजेपर्यंत मला बेदम मारहाण केली आणि घराबाहेर हाकलून दिले. त्यानंतर मी पुन्हा कधीच त्या घरी परत गेले नाही."

सोमवारी रात्री शर्मिलाने महिला एफ-५७ गोळाफेक प्रकारात हंगामातील सर्वोत्तम ९.८१ मीटर फेक नोंदवत सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीमुळे राष्ट्रकुल स्पर्धेतील पॅरा ॲथलेटिक्समध्ये भारताची तब्बल २० वर्षांची पदकांची प्रतीक्षा संपुष्टात आली. यापूर्वी २००६ मध्ये रणजित कुमार जयसीलनने बसून डिस्कस थ्रो प्रकारात पदक जिंकले होते.

एफ-५७ गटात खालच्या अवयवांमध्ये अपंगत्व, अवयवांची कमतरता किंवा स्नायूंची ताकद कमी असलेल्या खेळाडूंचा समावेश होतो. गोळाफेकीबरोबरच शर्मिला डिस्कस थ्रोमध्येही खेळते. राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वी तिने दुबईतील फज्जा आंतरराष्ट्रीय पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत गोळाफेकीत सुवर्ण, तर डिस्कस थ्रोमध्ये कांस्यपदक जिंकले होते.

हरियाणातील महेंद्रगड जिल्ह्यातील गरीब शेतकरी कुटुंबात वाढलेल्या शर्मिलाला वयाच्या दुसऱ्या वर्षी पोलिओ झाला. त्यामुळे तिच्या उजव्या पायावर परिणाम झाला. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. "माझी आई अंध होती, वडील शेतकरी होते. घरात दोन वेळचे जेवण मिळणेही कठीण होते. आयुष्य कधीच सोपे नव्हते," असे शर्मिलाने सांगितले. शर्मिलाच्या आयुष्यातील खरा बदल दुसऱ्या विवाहानंतर झाला. तिचे पती अजित सिंहने तिला पॅरा क्रीडा क्षेत्रात येण्यासाठी प्रोत्साहन दिले. प्रशिक्षक टेकचंद आणि देवेंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली तिने सराव सुरू केला. विशेष म्हणजे, शर्मिलाने वयाच्या ३४व्या वर्षी खेळात प्रवेश केला. २०२१ मध्ये पॅरा राष्ट्रीय स्पर्धेत पदार्पण करताच राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक जिंकले.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 29 जुलै 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY

# B.Sc. FORENSIC SCIENCES (Hons.)



## Be the Reason Behind the Truth.

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

### WHY CHOOSE THIS PROGRAM?

**EXPERIMENTAL LEARNING**
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

**FUTURE-READY SKILLS**
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

**FLEXIBLE CAREER PATHS**
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

### WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# पिंपरी-चिंचवडला हाय कॅपेसिटी ट्रान्सिटला गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात उच्चस्तरीय बैठक

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पुणे व पिंपरी चिंचवड शहरांमधील वाढत्या वाहतूक गरजा लक्षात घेऊन एचसीएमटीआर (हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रूट) आणि ई-आरटीएस (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम) या महत्त्वाकांक्षी सार्वजनिक वाहतूक प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती द्यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक व नियोजनासंदर्भातील सर्व कार्यवाही तातडीने सुरू करून प्रायोगिक प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करावा आणि नागरिकांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.**



> पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन एचसीएमटीआर आणि ई-आरटीएस या एकात्मिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मांडली. शहरातील मेट्रो, बीआरटी आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांना प्रभावीपणे जोडणारी, पर्यावरणपूरक, उच्च क्षमतेची आणि प्रवाशाभिमुख अशी ही प्रणाली विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री महोदयांनी प्रकल्पाच्या संकल्पनेचे स्वागत करत त्याच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महानगरपालिका या प्रकल्पाची नियोजनबद्ध आणि वेळेत अंमलबजावणी करून नागरिकांना आधुनिक, सुरक्षित आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पुणे व पिंपरी चिंचवड शहरांमधील वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणारे शहरीकरण आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेऊन भविष्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रवाशाभिमुख करण्याच्या दृष्टीने एचसीएमटीआर (हाय कॅपेसिटी मास ट्रान्सिट रूट) आणि वर्तुळाकार मार्ग विकास प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २७ जुलै २०२६ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के.एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अति पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी ई-आरटीएस (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम) या अत्याधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या संकल्पनेची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली. ही प्रणाली मेट्रोप्रमाणेच वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी असून रबर टायरवर धावणाऱ्या पूर्णतः इलेक्ट्रिक वाहनांवर आधारित असेल. एका वाहनामध्ये सुमारे २४० हून अधिक प्रवासी प्रवास करू शकतील, अशी क्षमता या प्रणालीमध्ये असेल, असेही ते यावेळी म्हणाले.

या प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून सुमारे १७ किलोमीटर लांबीचा प्रायोगिक मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या मार्गामध्ये गोडाऊन चौक – कुदळवाडी चौक – ऑटो क्लस्टर – काळेवाडी फाटा – जगताप डेअरी चौक – वाकड या प्रमुख भागांचा समावेश करण्यात आला आहे. हा प्रकल्प महामेट्रोच्या सहकार्याने सुमारे एक ते दीड वर्षाच्या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित करण्याचे नियोजन बैठकीत मांडण्यात आले.

प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर एचसीएमटीआर व शहरातील सर्व बीआरटी मार्गावर ई-आरटीएस प्रणालीचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार आहे. तसेच शहरातील सर्व मेट्रो स्थानके, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांशी प्रभावी व सुलभ जोडणी निर्माण करून नागरिकांना अखंड, जलद आणि प्रवाशाभिमुख प्रवासाचा अनुभव देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे सादरीकरणात स्पष्ट करण्यात आले.

या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना अधिक सुरक्षित, जलद आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले.

सादरीकरणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संकल्पनेचे स्वागत करून प्रकल्पास मान्यता दर्शविली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ई-आरटीएस प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करावी, तसेच प्रायोगिक प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही गतीने करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार एचसीएमटीआर आणि ई-आरटीएस प्रकल्पामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडून येण्यास मदत होणार असून, भविष्यातील शाश्वत, आधुनिक आणि एकात्मिक शहरी वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# मतदार यादीत नाव निश्चित करण्यासाठी ८ ऑगस्टपर्यंत गणना अर्ज भरा

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) – २०२६ कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना अर्ज भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केले आहे.**



वेळेत अर्ज सादर करणाऱ्या पात्र मतदारांची नावे १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, या मोहिमेअंतर्गत बीएलओंकडून घरभेटी देत गणना अर्जांचे वितरण व संकलन सुरू आहे. शहरातील प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव समाविष्ट व्हावे, यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यासंदर्भात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, "लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शहरातील सर्व पात्र नागरिकांनी गणना अर्ज वेळेत भरून संबंधित बीएलओकडे जमा करावा. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या नावाची खात्री करून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावे अथवा हरकती दाखल कराव्यात. एकही पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे." अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना म्हटले की, "विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची अंमलबजावणी शहरात नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. बीएलओंना आवश्यक सहकार्य करून नागरिकांनी गणना अर्ज वेळेत सादर करावेत. ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे."

गणना अर्ज वेळेत भरून सादर करणाऱ्या नागरिकांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या पात्र नागरिकांची नावे समाविष्ट झालेली नसतील किंवा नव्याने मतदार म्हणून नोंदणी करावयाची असेल, त्यांना १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नमुना क्रमांक ६ भरून अर्ज करता येणार आहे.

# पाणी कपात तात्काळ रद्द करा!

## राष्ट्रवादीच्या माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांची मागणी; सभागृहाचे लक्ष वेधले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पवना धरण १०० टक्के भरलेले असताना पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पाणी कपातीचा सामना करावा लागणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, शहरातील लागू असलेली पाणी कपात तात्काळ रद्द करून पूर्ववत नियमित, पुरेसा आणि वेळेवर पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी ठाम मागणी माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली.**



पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० लाख नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधताना त्यांनी सांगितले की, शहराला जीवनदायी ठरणारे पवना धरण पूर्ण क्षमतेने भरले असून, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने नदीपात्रातूनही नियमित पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे शहरावरील पाणीटंचाईचे संकट मोठ्या प्रमाणात दूर झाले आहे. असे असतानाही महापालिकेकडून अद्याप पाणी कपात कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे नागरिकांसह गृहनिर्माण संस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, अनेक सोसायट्यांना आजही टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, पवना धरण शंभर टक्के भरलेले असताना शहरावर पाणी कपातीचे संकट कायम ठेवण्यामागे नेमके कारण काय आहे, याबाबत प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर केला. आता धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळणे ही त्यांची रास्त अपेक्षा आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, औद्योगिक व व्यावसायिक आस्थापना तसेच घरगुती वापरासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. शहराचा वेगाने वाढणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता नियमित व नियोजनबद्ध पाणीपुरवठा करणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.

पाणी कपातीमुळे नागरिकांना टँकरसाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असून, सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडत असल्याकडेही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच, धरण पूर्ण क्षमतेने भरले असतानाही पाणी कपात कायम ठेवली जाणार असेल, तर भविष्यात पाणीसाठा किती टक्के झाल्यानंतर पाणी कपात रद्द करण्यात येणार, याबाबत स्पष्ट आणि पारदर्शक धोरण नागरिकांसमोर मांडण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी महापौर घोडेकर यांनी महापालिका प्रशासनाकडे चार प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये शहरातील लागू असलेली पाणी कपात तात्काळ रद्द करणे, पूर्ववत नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करणे, भविष्यात पाणी कपात लागू करण्यासाठी व रद्द करण्यासाठी स्पष्ट धोरण निश्चित करून ते जाहीर करणे तसेच शहरातील प्रत्येक भागात समान आणि न्याय्य पाणी वितरण सुनिश्चित करणे, या मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सध्याच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे, दररोजच्या पाणी वापराचे आणि आगामी वर्षभराच्या पाणी नियोजनाचे श्वेतपत्रक सभागृहासमोर सादर करावे, अशीही त्यांनी ठाम मागणी केली.

### महापालिका आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद

दरम्यान, माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी उपस्थित केलेल्या मागणीची दखल घेत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. पाणीपुरवठ्याच्या सध्याच्या परिस्थितीचा तातडीने आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात येणार असून, शहरातील लागू असलेल्या पाणी कपातीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले. पवना धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहराची दैनंदिन पाण्याची गरज आणि भविष्यातील नियोजनाचा सर्वंकष विचार करून नागरिकांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> “पाणी हा केवळ प्रशासकीय विषय नसून तो प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, आरोग्याशी आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. पवना धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना नागरिकांना पाणी कपातीचा सामना करावा लागणे ही दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे नागरिकांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा.
>
> **- डॉ. वैशाली घोडेकर, माजी महापौर, पिंपरी-चिंचवड.**

## पिंपरी-चिंचवड महापालिका भवनात झळकणार त्यागमूर्ती माता रमाईंचे तैलचित्र..!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**त्याग, संघर्ष आणि सामाजिक समतेचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे तैलचित्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भवन सभागृहात लावण्यात येणार आहे. यासंदर्भातील उपसूचना नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडली. या उपसूचनेला सभागृहाने सर्वानुमते मंजुरी दिल्याने लवकरच महापालिका भवनात माता रमाई यांचे तैलचित्र विराजमान होणार आहे.**



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमादरम्यान, दि. २८ एप्रिल रोजी पिंपरी चौक येथे उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर स्मारकाचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते पार पडले होते.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना भीमराव आंबेडकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे समाजाच्या वतीने महापालिका भवन आणि सभागृहात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे तैलचित्र लावण्याची सूचना केली होती. माता रमाई यांच्या त्यागमय जीवनातून समतेची, संघर्षाची आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळावी, अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. याच सूचनेचा पाठपुरावा करत नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी आजच्या सर्वसाधारण सभेत उपसूचना मांडली. सभागृहातील सर्व सदस्यांनी या प्रस्तावाला एकमताने पाठिंबा दिला आणि मंजुरी प्रदान केली. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इतिहासात सामाजिक समतेचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सन्मान करणारे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले असल्याची भावना व्यक्त होत आहे. लवकरच महापालिका भवन व सभागृहात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे तैलचित्र स्थापित करण्यात येणार आहे.

> “विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात खंबीर साथ देणाऱ्या माता रमाई यांचे योगदान अमूल्य आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आदरणीय भीमरावजी आंबेडकर यांनी केलेल्या सूचनेचा पाठपुरावा करत मी सर्वसाधारण सभेत ही उपसूचना मांडली. सभागृहाने ती सर्वानुमते मंजूर केल्याबद्दल माननीय महापौर रवी लांडगे तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे मनःपूर्वक आभार. लवकरच महापालिका भवनात माता रमाई यांचे तैलचित्र स्थापित होईल आणि ते सामाजिक न्याय, समता व मानवतेच्या विचारांची प्रेरणा देणारे कायमस्वरूपी स्मृतिस्थळ ठरेल, असा मला विश्वास आहे.”
>
> **- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# महापालिकेत स्वतंत्र आरोग्य समितीची स्थापना

## नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; सर्वसाधारण सभेत मंजुरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समितीच्या स्थापनेच्या विषयाला मंजुरी देण्यात आली. या समितीच्या स्थापनेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे शहर सुधारणा समिती सदस्य तथा भाजपा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे.**




झपाट्याने वाढणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात आरोग्य विषयक प्रश्नांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेला अधिक सक्षम करण्यासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता असल्याची भूमिका डॉ. सुहास कांबळे यांनी सातत्याने मांडली होती. त्यासाठी त्यांनी महापालिका प्रशासन तसेच सभागृहात वारंवार पाठपुरावा केला होता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३० (१) अंतर्गत विशेष समिती स्थापन करण्यास यापूर्वी तत्वतः मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर समितीचे कामकाजाचे क्षेत्र, अधिकार व कर्तव्ये निश्चित करणारा विषय नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर करण्यात आला. सभागृहाने या विषयाला मंजुरी दिल्याने आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समितीची अधिकृत स्थापना झाली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुहास कांबळे यांनी शहरातील वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सेवांवरील वाढता ताण लक्षात घेऊन स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समितीची गरज सातत्याने अधोरेखित केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर समितीच्या स्थापनेला अंतिम मंजुरी मिळाल्याने आरोग्य क्षेत्रातील हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

विशेष म्हणजे या समितीला ₹१० लाखांपेक्षा अधिक आणि ₹५० लाखांपर्यंतच्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यता प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तर ₹५० लाखांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावांबाबत महापालिका सभेकडे शिफारस करण्याचे अधिकारही समितीकडे असणार आहेत. त्यामुळे आरोग्य विभागातील विकासकामे, वैद्यकीय सुविधा आणि नागरिकांशी संबंधित निर्णय अधिक जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

### आरोग्य सेवांच्या बळकटीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल

या समितीच्या माध्यमातून महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कामकाजावर अधिक प्रभावी देखरेख ठेवता येणार असून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यास गती मिळणार आहे. शहरातील महापालिका रुग्णालये, दवाखाने, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, संसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, राष्ट्रीय आरोग्य अभियानाची अंमलबजावणी, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, दवाखाना व रुग्णालय नोंदणी, पीसीपीएनडीटी कायदा, वैद्यकीय गर्भपात कायदा, सार्वजनिक आरोग्य विषयक विविध बाबी तसेच पशुसंवर्धन विभागाशी संबंधित आरोग्यविषयक कामकाज या समितीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यात आले आहे.

“पिंपरी-चिंचवड हे वेगाने विस्तारत असलेले शहर आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्य व्यवस्थाही अधिक सक्षम आणि गतिमान होणे आवश्यक होते. त्यामुळे स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समितीची स्थापना व्हावी, यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला. आज या विषयाला सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्याचा आनंद आहे. या समितीच्या माध्यमातून महापालिकेची रुग्णालये, दवाखाने, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन आदी विषयांवर अधिक परिणामकारक निर्णय घेता येतील. नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सुविधा मिळाव्यात, हा या समितीचा प्रमुख उद्देश असेल.”

**- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# गायत्री स्कूल,मोशी येथे विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दि. २८ जुलै २०२६ रोजी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल, मोशी येथे विद्यार्थी परिषदेच्या पदग्रहण समारंभ व शपथविधी सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भारतीय सैन्य दलातील मान्यवर सेवानिवृत्त अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारतीय सैन्यात तब्बल ३० वर्षे गौरवशाली सेवानिवृत्त सुबेदार मेजर के. बी. आढाव तसेच भारतीय हवाई दलात २० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावलेले वॉरंट अधिकारी सेवानिवृत्त मा श्री. बाळू अबनवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**






कार्यक्रमाला गायत्री ग्रुप ऑफ स्कूलचे आदरणीय अध्यक्ष मा. श्री. विनायकराव भोंगाळे, नगरसेविका व संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका मा. सौ. कविताताई भोंगाळे- कदू पाटील, संस्थेचे सचिव मा. श्री संजय भोंगाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्रीमती अंजली भागवत , तसेच संस्थेचे विपणन अधिकारी मा. श्री. शैलेंद्र सिंग यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून यथोचित सत्कार करण्यात आला व कार्यक्रमाच्या उद्देशाची माहिती देण्यात आली.

यावेळी शाळेच्या विद्यार्थी परिषदेची घोषणा करण्यात आली. नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या पदाची जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याची शपथ घेतली. विद्यार्थी प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त करत नेतृत्व, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त, कठोर परिश्रम, नेतृत्वगुण आणि जबाबदार नागरिकत्व यांचे महत्त्व पटवून दिले. "देशसेवा ही केवळ सैन्यात भरती होऊनच करता येते असे नाही, तर आपण आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करूनही देशाच्या प्रगतीत योगदान देऊ शकतो," असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शाळेचे सर्व मुख्याध्यापक उप-मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमा प्रसंगी पालक -शिक्षक संघाचे सचिव व सदस्य तसेच इतर पालक वृंद ही उपस्थित होते.

विद्यार्थी परिषदेच्या शपथविधी सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, कर्तव्यनिष्ठा व राष्ट्रप्रेमाची भावना दृढ होण्यास निश्चितच मदत होणार आहे.